# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय – भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दतील खालील दोन विकास कामे करणेकरीता शासन योजनेअंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे सन २०२३-२४ चे सुधारीत तसेच सन २०२४-२५ चा मुळ अर्थसंकल्प तयार करतांना सन २०२४-२५ करीता रु.९.०० कोटी तरतूद करणेत आली होती. तरतुद संपल्यामुळे सदर लेखाशिर्षामध्ये इतर लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करुन रु.१५४५.०० लक्ष तरतूद होती, त्यामधून रु. १५२७.१० लक्ष तरतूद खर्च झाली असून रु. १७.९० लक्ष शिल्लक आहेत. जिल्हाधिकारी नियोजन अधिकारी,ठाणे, महाराष्ट्र शासन,जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील प्राप्त पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत खालील विकास कामे करण्यासाठी रुपये २,२४,३१,९२४/- इतका खर्च अपेक्षित असून शासनाचा हिस्सा ७० टक्के ( रु. १,५७,,०२,३४७/-) इतका राहणार आहे व मनपा चा ३० टक्के हिस्सा (रु.६७,२९,५७७/- ) इतका आहे. सदरची कामे करणे महत्वाची असल्याने निधी अभावी प्रलंबीत आहेत, शासन योजनेअंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये निधी अपुरा असल्याने बांधकाम विभागातील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करणेत येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा०. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि.०४/१२/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम (रक्कम लाखात) | दि. ०४/१२/२०२४ पर्यंतची शिल्लक (रक्कम लाखात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा | रु. १५४५.०० लक्ष | रु. १५२७.१० लक्ष | रु.१७.९० लक्ष | |
| | एकूण | रु. १५४५.०० लक्ष | रु. १५२७.१० लक्ष | रु.१७.९० लक्ष | |

सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामध्ये शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामधील निधी अल्प असल्यामुळे खालील कामांचे अंदाजपत्रक रु. २,२४,३१,९२४/- इतक्या रक्कमेचे आहेत. त्यातील मनपा चा ३० टक्के हिस्सा रु.६७,२९,५७७/- होत असून शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये रु.१७.९० शिल्लक तरतूद आहे. खालील कामाची निकड पहाता बांधकाम विभागाकडील लेखाशिर्षामधून रु. ५१.०० लक्ष रुपयाचे शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन केल्यास रु.६८.९० लक्ष विकास कामांकरीता निधी उपलब्ध होऊ शकतो. त्याबाबत मा.आयुक्त सा०. यांनी पुनर्विनियोजनाकरीता दि.३/१२/२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे.

**बांधकाम विभाग आणि विदयुत विभाग यांचेकडील विकास कामांचे नाव खालील प्रमाणे-**

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | भिवंडी निजामपूर शहर मनपा प्रभाग समिती क्र.०३ च्या कार्यक्षेत्रातील वार्ड क्र.२१ मधील ओसवालवाडी कल्पतरु गार्डन,मनीसोम उपासरे पर्यत सी.सी रस्ता व आर.सी.सी गटर तयार | रु.१९९,४७९८४/- |

| | | |
|---|---|---|
| | करणे. (बांधकाम विभाग) | |
| २ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३ च्या कार्यक्षेत्रातील ओसवालवाडी रस्ता स्ट्रिट लाईट व्यवस्था करणे. (विदयुत विभाग) | रु.२४,८३,९४०/- |
| | **एकूण** | **रु.२,२४,३१,९२४/-** |

**खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.**

| **अ. क्र.** | **लेखाशिर्षाचे नाव** | **सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात)** | **दि. ०४/१२/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम (रक्कम लाखात)** | **दि.०४/१२/२०२४ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम(रक्कम लाखात)** | **पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम (रक्कम लाखात)** |
|---|---|---|---|---|---|
| १ | शाळेच्या इमारती बांधणे | रु. १००.०० लक्ष | रु.६०.०० लक्ष | रु.४०.०० लक्ष | ३९.०० लक्ष |
| २ | विकास आराखडयातून रस्ता रुंदीकरण करणे | रु. ३४.६९ लक्ष | रु. ०.०० लक्ष | रु. ३४.६९ लक्ष | रु.१२.०० लक्ष |
| | एकूण | | | | रु.५१.०० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा◌ो. यांच्याकडे निहीत आहेत.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत उक्त दोन कामांकरीता मनपा हिस्याची ३० टक्के रक्कम नसल्यामुळे बांधकाम विभागातील लेखाशिर्षामधून रु.५१.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणेकामी मुळ संचिकेसह प्रस्ताव तयार केलेला आहे. त्या अनुषंगाने शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये रु.५१.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास दिनांक /११ /२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** ६९७ **दिनांक** ९ /१२/२०२४

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजने अंतर्गत भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील उकत् दोन विकास कामे रुपये २,२४,३१,९२४/- इतका खर्च अपेक्षित असून शासनाचा हिस्सा ७० टक्के ( रु. १,५७,,०२,३४७/-) इतका आहे व मनपा चा ३० टक्के हिस्सा (रु. ६७,२९,५७७/-) इतका आहे. सदर कामे करणे गरजेचे असल्याने मनपा ३० टक्के हिस्सा (रु.६७,२९,५७७/- ) इतका असून शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये निधी पुरेसा नाही. तरी बांधकाम विभागाकडील लेखाशिर्षामधून रु.५१.०० लक्ष रुपये निधीचे शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणे गरजेचे आहे, सबब निधी पुनर्विनियोजनाने वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

नमुना क्र.१०

नियम ३० (३) पहा

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

| या लेखाशिर्षातुन | | | | | | या लेखाशिर्षाकरिता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यत खर्च | आज तारखे पर्यत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यत खर्च | आज तारखे पर्यत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च (रक्कम लाखात) | अभिप्राय |
| १ | भांडवली खर्च भाग-४ | अ/१/१ शाळेच्या इमारती बांधणे | सन २०२४-२५ करीता रु.१०० लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.६०.०० लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.४०.०० लक्ष | महसुली खर्च भाग-२ | शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा | सन २०२४-२५ करीता रु.१५४५.०० लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.१५२७.१० लक्ष | ३९.०० | शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये रु.५१.०० लक्ष निधीचे सदर शिर्षामधुन पुनर्विनियोजनाने रककम वर्ग करणेत येत आहे. |
| २ | भांडवली खर्च भाग-४ | अ-३/१/२ विकास आराखडयातून रस्ता रुंदीकरण करणे | सन २०२४-२५ करीता रु.३४.६९ लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.००.०० लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.३४.६९ लक्ष | महसुली खर्च भाग-२ | शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा | सन २०२४-२५ करीता रु.१५४५.०० लक्ष | सन २०२४-२५ करीता रु.१५२७.१० लक्ष | १२.०० | |
| | | एकूण | | | | | | | | रु.५१.०० लक्ष | |

टिपणीत दिलेल्या अभिप्रायानुसार.

शहर अभियंता
भिवंडी नि.शहर मनपा

o/c

मुख्य लेखा परिक्षक
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
भिवंडी नि.शहर मनपा

अति. आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा